# राष्ट्रीय सुरक्षा दिनानिमित्त पुणे मेट्रो कडून विविध कार्यक्रमांचे अयोजन

पुणे ५ मार्च २०१९: भारतात राष्ट्रीय सुरक्षा परिषदची स्थापना ४ मार्च १९६६ साली करण्यात आली आणि त्या दिवसांपासुन राष्ट्रीय सुरक्षा दिन ४ मार्च रोजी साजरा केला जतो. पुणे मेट्रोने ४ मार्च ते ११ मार्च असा राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह दरम्यान कर्मचाऱ्यामध्य सुरक्षे विषयी जागृतीसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे .

महा मेट्रो ३१ क़िमीची महत्वाकांक्षी प्रकल्प पुण्यात साकारत आहे . या प्रकल्पाच्या व्हायाडक़्ट, स्टेशन, डेपो , भुयारी मार्ग, ह्यांची कामे पुणे शहरात ठिकठिकाणी चाललेली असुन महामेट्रो या कार्यास्थिळांवरील कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी सर्वोतोपरि प्रयत्न करत आहे . महामेट्रोमध्ये महाप्रबंधक दर्जाच्या सुरक्षाविषयक अधिक़ारी कार्यरत असुन ते सतत क़सलन्ट्टट चे सुरक्षा अधिकारी व कॉन्ट्रक्टरचे सुरक्षा अधिकारी यांच्याशी नियमित संपर्कात असुन सुरक्षेचा आढावा घेत असतात व त्यात सुधारणा करत असतात. महामेट्रोने ४ मार्च राष्ट्रीय सुरक्षा दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे अयोजन करण्यात आले .

१)सुरक्षा विषयक जागृतीसाठी तज्ञ मार्गदर्शकांकरवी , परिसंवाद , चर्चासत्रद्वारे माहिती देण्यात आली.

२) सुरक्षाविषयक उपकरणे पीपीई ( Personal Protective equipment) यांचे हाताळणी , वापर यांचे प्रात्यक्षिक देण्यात आले .

३) कर्मचाऱ्याना सुरक्षा विषयी माहिती सोप्या भाषेत समजावी म्हणून सुरक्षा विषयी नाटिका (street play) चे आयोजन करण्यात आले .

४) उंच ठिकाणी काम करण्यासाठी घेण्यात येणारी सावधानता व आपातक़ालीन सुविधा याविषयी विषेश प्रशिक्षण देण्यात आले .

५) कार्यस्थळी सामांनाचे रखरखा व अपघात होउ नये यासाठिचे विशेष प्रशिक्षण कर्मचाऱ्यांना देण्यात आले .

४ ते ११ मार्च या सुरक्षा सप्ताह दरम्यान पुणे मेट्रोने सुरक्षा उपकरणांचे प्रदर्शन , सुरक्षा उपकरणांचा वापर , सुरक्षाविषयी जनजागृतीसाठी नाटिका (street play) , परिसंवाद , प्रश्नमंजुषा अशा भरगच्च कार्यक्रमांचे अयोजन करण्यात आले आहे . पुणे मेट्रो कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी कटिबद्ध असुन मेट्रोच्या कार्यस्थळावर पीपीई व नॉन पीपीई असे विभाग करण्यात आले आहे .जेणेकरुन पीपीई विभागामध्ये कर्मचारी हेल्मेट्चे व ईत्यादी सुरक्षा उपकरणे (Personal Protective equipment) घालुनच प्रवेश करतील .

महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दिक्षीत यांनी या प्रंसगी सर्व कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या असुन सुरक्षेचे काटेकोर पालनासाठी महामेट्रो सर्वोच्च प्राधान्य देत आली आहे व भविष्यात देईल असे नमुद केले .